DISTRICT AND SESSIONS
COURT, SATARA.
INWARD NO. 6236
DATE - 20/04/2026
REGISTRAR

जा.क्र. 3543/ २०२६
मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय,सातारा
दिनांक : 20/०४/२०२६

निविदा

मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, सातारा या न्यायालयातील झेरॉक्स/ नकलेचे काम बाहययंत्रणेद्वारे (Outsourcing) करुन घेणेसाठी सेवा पुरवठादार यांचेकडून निविदा मागविणेत येत आहेत.

अटी व शर्ती —

१. ए—४, लिगल साईज, व ए—३ अशा तीनही आकाराच्या कागदांच्या प्रत्येक झेरॉक्स प्रतींसाठीचा दर पुढील तक्त्यात नमुद करणे आवश्यक आहे.

	ए—४ साईज	लिगल साईज	ए—३ साईज
दर सिंगल पेज रु			
दर पाठपोठ पेज रु			

२. झेरॉक्स मशीन सेवापुरवठादार यांनी स्वखर्चाने स्थापित करणेची आहे. झेरॉक्सच्या प्रती या सुवाच्च व स्पष्ट असणे आवश्यक आहे.
३. सदर झेरॉक्स मशीनची देखभाल व दुरूस्ती तसेच कागद, विदयुत देयक व ऑपरेटर या बाबींचा खर्च सेवा पुरवठादार यांनी करणेचा आहे.
४. सेवा पुरवठादार यांनी विनाशर्त रक्कम रूपये ५००० /— चे (Bank Guarantee Bond) बॅक हमी बंधपत्र सादर करणे आवश्यक आहे.
५. सेवा पुरवठादार यांनी सदरील झेरॉक्स मशीनमुळे भोवतालच्या जागेमध्ये नुकसान /तेथे उपस्थित लोकांना संभाव्य इजा/दुखापत इत्यादी या दृष्टीने विमा पॉलिसी उतरविणे आवश्यक आहे.

सेवा पुरवठादार यांचेसोबत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील वेळोवेळी निर्देशान्वये प्राप्त झालेल्या अटी व शर्तीना अधीन राहून सेवा करार करणेत येईल. सदरील करार हा अंमलात आलेच्या तारखेपासून पुढील एक वर्षासाठी अस्तित्वात राहील.

संबंधीत निविदादारांनी त्यांच्या निविदा सिलबंद लखोटयामध्ये मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय,सातारा या कार्यालयात दिनांक २९/०४/२०२६ रोजी अगर त्यापुर्वी सादर करण्यात याव्यात. सदर सिलबंद लखोटयावर "मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय,सातारा येथील झेरॉक्सचे काम बाहययंत्रणेद्वारे करणेसाठी निविदा" असा स्पष्ट उल्लेख करावा. मुदत संपलेनंतर प्राप्त झालेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

निविदा स्विकारण्याचे किंवा नाकारण्याचे पुर्ण अधिकार मा. मुख्य न्यायदंडाधिकारी. सातारा यांना राहतील. तसेच प्राप्त झालेल्या निविदांमधील दर वाजवी /रास्त नसल्यास संबंधीत निविदा नाकारण्याचे अधिकार राखून ठेवण्यात येत आहेत.

निविदा उघडल्यानंतर आवश्यकता वाटल्यास, निविदादार यांना मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय सातारा या कार्यालयात उपस्थित रहावे लागेल. यासाठी निविदादार यांनी लखोटयावर त्यांच्या फर्मचे पुर्ण नाव व पत्ता आणि दुरध्वनी/ भ्रमणध्वनी क्रमांक नमुद करणे आवश्यक आहे.

निविदादार यांचे कोणत्याही न्यायालयात दिवाणी अथवा फौजदारी प्रकरण प्रलंबीत नसल्याबाबत तसेच कोणत्याही न्यायालयाने त्यांना त्यांचे फर्मला दोषी सिध्द केले नसल्याबाबतचे हमीपत्र निविदेसोबत सादर करणे आवश्यक आहे.

आदेशावरून,

सहाय्यक अधिक्षक,
मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, सातारा

प्रत —

१. सहाय्यक अधिक्षक, मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, सातारा यांचेकडे —

ज्यादा प्रत — बेलिफ, दिवाणी न्यायालय व.स्तर,सातारा यांचेमार्फत मूख्यालय इमारतीच्या परिसरातील सर्व शासकिय कार्यालयांच्या नोटीसबोर्डावर प्रसिध्दीसाठी.जिल्हा न्यायालय, सातारा, दिवाणी न्यायालय व.स्तर, सातारा, मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, सातारा , जिल्हा विधीज्ञ संघ , जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांचे नोटीस बोर्डावर प्रसिध्दीसाठी.

२. संगणक विभाग यांचेकडे जिल्हा न्यायालय, साताराच्या अधिकुत संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी.

३. मा. जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, नविन प्रशासकीय इमारत, तिसरा मजला,एसटी स्टँड बाजूला, हजेरी माळ, सातारा.